# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन पूर्व आराखडा

**"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन"**
**(इ.स.१८२७ ते इ.स.१८९०)**

संशोधक
**हानमंत नामदेवराव कुरे**
एम.ए.(इतिहास) बी.एड.सेट.नेट.

**मार्गदर्शक**
**डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे**
प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक
पदवी व पद्व्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र,
यशवंत महाविद्यालय नांदेड.

संशोधन केंद्र
पदवी व पद्व्युत्तर इतिहास विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड.

वर्ष २०२२-२३

## "एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन"

## (इ.स.१८२७ ते इ.स.१८९०)

**प्रस्तावना :-**

एकोणिसावे शतक महाराष्ट्राच्या इतिहासात सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीय अशा सर्व अंगाने मौलिक स्वरूपाचे परिवर्तन घेऊन आले. ब्रिटिश पूर्व कालीन भारतीय समाज जीवनावर अनिष्ट प्रथा व परंपरांचा पगडा होता. धार्मिक कर्मकांडाचे स्तोम माजले होते. भारतीय समाजात वर्ण व्यवस्था, अस्पृश्यता, स्त्रीदास्य, अज्ञान, जातीभेद या सारख्या अनिष्ट प्रथा रूढ होत्या.

तत्कालीन समाजात स्त्रीयांना पशुवत वागणूक दिली जात होती. धर्म आणि प्रचलित पुरुषप्रधान संस्कृतीने सर्व कौटुंबिक व सामाजिक अधिकार पुरुषांकडे दिले होते तर स्त्रीयांना कसलेही अधिकार नव्हते. स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यांना कोणत्याही प्रकारचे निर्णय स्वातंत्रे नव्हते , तसेच कोणतीही सामाजिक, धार्मिक व राजकीय स्वतंत्रता नव्हती. त्याचप्रमाणे समाजात बालविवाह, सती प्रथा, केशवपन, बालहत्या, बहुपत्नी, जरठविवाह यासारख्या अमानवी प्रथा प्रचलित होत्या, त्यामुळे स्त्रियांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनले होते. याही पेक्षा हलाखीची परिस्थिती शुद्र आणि अतिशुद्राची होती. त्यांचे माणूस म्हणून जीवन जगण्याचे सर्व अधिकार प्रचलित व्येवस्थेने काढून घेतले होते.

तत्कालीन समाजात स्त्री, शूद्र, शेतकरी, कामगार याबाबतची अन्यायी व पक्षपातीपणाच्या होत्या. त्यांचे हक्क डावलले गेले होते. समानता व मानवतेच्या भूमिकेतून त्यांच्याकडे पाहिले जात नव्हते. अशावेळी ब्रिटिशांच्या आगमनाने भारतात आधुनिक विचारांचा प्रारंभ झाला, त्यासाठी इंग्रजी भाषा आणि त्यांची शिक्षण पद्धती कारणीभूत ठरली. ब्रिटिशांनी आणलेली पाश्चात्य शिक्षण पद्धती, प्रचलित शिक्षण पद्धती पेक्षा वेगळी होती. ती सर्व जाती वर्णांना खुली होती. यामुळे पाश्चात्य शिक्षण आणि तत्त्वज्ञानाने शिक्षित झालेला नवा वर्ग उदयास आला.

यामुळे भारतातील नवशिक्षित झालेले बुद्धिवंत आत्मपरीक्षण करू लागले आणि त्यातूनच अनेक सामाजिक, राजकीय विचारवंत निर्माण झाले. यामध्ये राजा राम मोहन राय, महात्मा ज्योतिराव फुले, बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, नाना शंकरशेठ, विष्णुबुवा ब्रम्हचारी, भाऊ दाजी लाड, विष्णुशास्त्री पंडित, गणेश वासुदेव जोशी, गोपाळ गणेश आगरकर, विष्णुशास्त्री चिपळूणकर असे कितीतरी ज्ञात-अज्ञात सुधारक ज्यांनी भारतीयांच्या आचार-विचारांना योग्य दिशा देण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. यामध्ये सर्वात मूलगामी आणि क्रांतिकारक कार्य महात्मा फुले यांचे मानले जाते.

महात्मा ज्योतिराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाजपरिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक होते. त्यांनी विषमतामूलक समाजात समता, मानवता, विवेक आणि बंधुभाव

निर्माण करण्यासाठी आपले सारे आयुष्य खर्ची केले. महात्मा फुले यांनी व्यक्तीला गुलाम करणाऱ्या अनैसर्गिक अधिकाऱ्याच्या विरोधात लढा उभारला होता.समाजात अस्तित्वात असलेली सामाजिक विषमता नष्ट करणे आणि समताधिष्टीत समाजाची निर्मिती करणे हे त्यांचे ध्येय होते.त्यामुळे त्यांनी विषमतेवर आधारित रूढी आणि परंपरांना विरोध केला होता.

महाराष्ट्रातील प्रचलीत अशा विषमतामूलक परिस्थिती मध्ये महात्मा फुले यांनी विवेक आणि मानवतावादाच्या पायावर जीवनाकडे पाहण्याचा एक नवा सत्यनिष्ठ दृष्टीकोन महाराष्ट्राला दिला आणि हिच महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणांची नांदी ठरली. महात्मा फुले यांनी आपल्या विचार व कार्यातून सामाजिक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक  सुधारणा घडून आणल्या या मूलगामी सुधारणांचा समता व सामाजिक न्याय हा पाया आहे. त्यांनी त्यांच्या विचार व कार्यातून शोषीत, पीडित, शुद्र, अतिशूद्र, स्त्रिया, शेतकरी, कामगार यांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले समताधिष्टीत कार्य अतिशय महत्वपूर्ण मानले जाते.

**संशोधन विषयाची निवड :-**

एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रामध्ये प्रबोधनयुगाला आरंभ झाला त्यांच्या मुळाशी महात्मा फुले यांचे मूलगामी विचार व कार्य महात्मा फुले यांचे विचार आणि कार्य आपल्याला मानवाची प्रतिष्ठा, धार्मिक सहिष्णुता, मानवी हक्क, मानवी समानता यांचा संदेश देते. सत्य आणि न्याय यावर आधारित समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचे महात्मा फुले यांचे स्वप्न अजूनही पूर्ण झालेले नाही. त्यामुळे त्यांच्या मूलगामी विचार व कार्य यांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. भारतातील व महाराष्ट्रातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि राजकीय परिस्थिती पाहता महात्मा फुले यांचा सामताधीष्टीत न्यायाचा जो दृष्टीकोन होता त्याचा मागोवा घेणे महत्त्वपूर्ण ठरेल म्हणून **"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन "** प्रस्तुत विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

प्रस्तावित विषयाचे संशोधन करीत असताना खालील उद्दिष्टे समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात येईल.

१) एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाचा अभ्यास करणे.
२) महात्मा फुले यांचा समतेचा दृष्टीकोन अभ्यासणे.
३) महात्मा फुले यांच्या समताधीष्टीत सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारांचा अभ्यास करणे.
४) महात्मा फुले यांच्या धार्मिक व आर्थिक क्षेत्रात केलेल्या समताधिष्टीत कार्याचा आढावा घेणे.

५) महात्मा फुले यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या समताधिष्टीत कार्याचे अवलोकन करणे.

**संशोधनाची गृहितके :-**

१) एकोणिसाव्या शतकात समाजामध्ये विषमता अस्तित्वात होती.
२) महात्मा फुले यांनी मांडलेले विचार व कार्य समताधिष्टीत होते.
३) महात्मा फुले यांच्या विचार व कार्यातून महाराष्ट्रात सामाजिक व शैक्षणिक परिवर्तन घडून आले .
४) महात्मा फुले यांचे विचार आणि कार्ये मूलगामी स्वरूपाचे होते.
५) महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचे महाराष्ट्रावर आमूलाग्र परिणाम झाले.

**संशोधन पद्धती:-**

प्रस्तुत विषयाची मांडणी करताना प्रामुख्याने संशोधन पद्धती मध्ये अधिक वास्तव निष्कर्ष काढता यावेत यासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा व वर्णनात्मक, विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

तथ्य संकलन:-

संशोधन कार्यात तथ्य संकलनाला फार महत्त्वाचे स्थान आहे. विषयाची अचूक आणि वास्तव मांडणी करण्यासाठी तथ्य संकलन महत्त्वाचे आहे हे संकलन दोन प्रकारे केले जाते

१. प्राथमिक स्त्रोत / साधने

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने अचूक माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक स्त्रोत महत्त्वाचे आहेत यात महात्मा फुले यांचे साहित्य आणि लेखन या कार्याबरोबरच समकालीन लेखकांनी लिहिलेल्या आणि वृत्तपत्रीय साधनांचा वापर करण्यात येईल.

२. दुय्यम स्त्रोत / साधने

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक सामग्री बरोबर दुय्यम सामग्रीचा वापर करून त्यांचे संकलन केले जाईल यामध्ये त्या व्यक्तीचे जीवन चरित्र, प्रकाशीत, अप्रकाशित कागदपत्रे, दैनिके, मासिके, कार्यालयीन अहवाल तसेच इंटरनेट वरील संबंधित माहिती इत्यादी साधनांचा आधार घेण्यात येईल.

**संशोधन विषयाची व्याप्ती :-**

**"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन"** हा प्रस्तावित संशोधन विषय असून या विषयाचा अभ्यास करताना एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील आरंभ कालीन परिस्थितीचा व महात्मा ज्योतिराव फुले यांचा जीवन काळाचा म्हणजे इ.स.१८२७ ते इ.स.१८९० पर्यंतच्या कालखंडाची अभ्यास करण्यात येईल.

**संशोधन विषयाची गरज व महत्त्व:-**

महात्मा फुले यांनी सामाजिक परिवर्तन आणि समाज सुधारणा यासाठी समताधिष्टीत न्यायाचा मांडलेला विचार 19 व्या शतकातील समाज प्रबोधन चळवळीची खास वैशिष्ट्य आहे. धर्म, शिक्षण, स्त्रीदास्य, अस्पृश्यता, जातिभेद, शेती प्रश्न आणि इतिहास व संस्कृती या क्षेत्रातून ब्राह्मणी वर्चस्व नाकारून क्रांतिकारी सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे या सूत्रावर समतावादी विचार मांडला. महात्मा फुले यांनी जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था आणि पुरुषप्रधान संस्कृती यावर कठोर हल्ला चढवून सामाजिक समता निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. या देशातील सर्वांगीण विषमतेचे मूळ धर्म आहे हिंदू धर्मातील हिंदू धर्माने जाणीवपूर्वक बहुजन समाजावर धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादून सामाजिक समतेचाप्रवाह रोखून धरला आहे. धर्मातील कर्मकांड अनिष्ट प्रथा परंपरा आणि प्रतिष्ठा यावर त्यांनी परखड भाष्य त्यांनी केले.

महात्मा फुले यांचा हा समतावादी विचार व आजची वस्तुस्थिती पर्यायाने अपेक्षा आणि फलश्रुती यांची तुलना केली तर त्यात प्रचंड दरी आहे वस्तुतः प्रत्यक्ष परिणाम हीच समतेची कसोटी असली पाहिजे हा महात्मा फुले यांचा समता विषयकआशय आज लुप्त झाला आहे. 1990 नंतर शासनाने स्वीकारलेल्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे धोरण सामाजिक व आर्थिक समस्येला पूर्णपणे सोडचिठ्ठी देणार आहे. समतेचा समुदाय वादी विचार मागे पडून व्यक्तिवादी विचार प्रबळ झाला आहे. शोषित वंचित घटक बाबत कमालीची अनास्था व उदासीन वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. अशा वेळी महात्मा ज्योतीराव फुले यांच्या विवेकी वारसा समजून घेऊन त्यांनी केलेल्या समताधिष्टीत केलेल्या कार्याचा उपयोग समाजाला व्हावा या हेतूने सदरील विषय संशोधनासाठी निवडलेला आहे.

**संशोधन विषयाची मर्यादा:-**

महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचा अभ्यास केला तर त्यांच्या कडे महराष्ट्रातील मूलगामी समाज सुधारणेचे जनकत्व जाते. स्त्री, शुद्र, अतिशूद्र, कामगार, शेतकरी यांच्या काल्यानासाठी अहोरात्र झटणाऱ्या व संपूर्ण मानवजाती साठी धर्मजातपंथादीविरहीत सामाजिक समतेची मागणी करणाऱ्या या मानवतावादी महापुरुषाचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक या क्षेत्रातील कार्ये अलौकिक असे आहे.

म्हणून प्रस्तुत संशोधन कार्यासाठी अध्ययनाचे क्षेत्र केवळ महात्मा फुले यांचे समताधिष्टीत कार्य यापुरतेच मर्यादित राहील.

**संशोधन समस्या:-**

**"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन"** या संशोधनाची मूलभूत समस्या आहे. या समस्येचा चिकित्सक अभ्यास करून एकोणिसावे शतक आणि महात्मा फुले यांची समताधिष्टीतन्याय या संकल्पनांचा वस्तुनिष्ठ आढावा सदरच्या संशोधनात मांडण्यात येईल.

**संदर्भ साहित्याचे पुनर्विलोकन:-**

पं.सि.पाटील. 'महात्मा ज्योतिराव फुले' हा महात्मा फुले यांचा चरित्र ग्रंथ असून या ग्रंथांत महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचे विविध पैलू मांडलेले आहेत.

भास्कर लक्ष्मण भोळे यांनी 1997 मध्ये 'जोतीरावांची समता संकल्पना' या पुस्तकाचे लेखन केले असून यात त्यांनी महात्मा फुले यांच्या समता संकल्पनेचा आढावा घेतलेला आहे.

ग. बा. सरदार 'महात्मा फुले व्यक्तित्व आणि विचार' प्रस्तुत ग्रंथात महात्मा फुले यांच्या जीवन कार्याचा तसेच त्यांच्या समता आणि सामाजिक न्याय या संदर्भात लेखन केलेले आहे.

प्रा. नागोराव कुंभार यांनी 'समाज सुधारक महात्मा फुले' या नावाचे पुस्तक लिहिले असून या पुस्तकात महात्मा ज्योतिबा यांच्या कार्यव वांग्मयाचाआढवाघेतलेला आहे.

प्रा. तानाजीठोंबरे यांनी 1991 मध्ये 'महात्मा फुले यांचे शैक्षणिक कार्य' या पुस्तकाचे लेखन केले संबंधित पुस्तकात महात्मा फुले यांनी केलेल्या शैक्षणिक कार्याचे सविस्तर विवेचन केले आहे.

मुरलीधर जगताप यांनी 1998 मध्ये' युगपुरुष महात्मा फुले' हिंदी भाषेत पुस्तक प्रकाशित केले या पुस्तकाद्वारे त्यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा लेखाजोखाहिंदी भाषिक समुदायासाठी उपलब्ध करून दिला.

बा. ह. कल्याणकर ‘महात्मा फुले विचार आणि संदर्भ’ या पुस्तकात महात्मा फुले यांचे सामाजिक तत्त्वज्ञान विषयाचे विचार आणि संदर्भ स्पष्ट करून सांगितले आहे.

संभाजी खरात ‘महात्मा फुले आणि निर्मिक’ या पुस्तकाची रचना केली असून यात महात्मा फुले यांची निर्मिक संकल्पना याबाबतची माहिती प्रस्तुत पुस्तकात सांगितले आहे.

प्रा. जी. ए. उगले यांनी ‘महात्मा फुले एक मुक्त चिंतन’ या पुस्तकाचे लेखन केले असून या पुस्तकातून सर्वसाधारणपणे महात्मा फुले यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतलेला आहे. यात यांच्या शैक्षणिक धोरण, स्त्री मुक्ती आंदोलन, कृषी क्रांतीची मूलगामी विचारधारा सामाजिक विषमतेची चिरफाड करणारे गुलामगिरी, सत्यशोधक समाज तसेच विश्व मानवतावाद यासंबंधी सखोल असे विचार मांडले आहेत.

आ. ह. साळुंखे यांनी ‘महात्मा फुले आणि धर्म’ या नावाचे पुस्तक महात्मा फुले स्मृती शताब्दी निमित्त प्रकाशित केले असून प्रस्तुत पुस्तकातून महात्मा फुले यांची धर्माविषयाची भूमिका अगदी संक्षेपाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

रा.ना. चव्हाण यांनी ‘महात्मा फुले यांचा शोध व बोध’ या ग्रंथात रा.ना. चव्हाण संकलित केलेल्या लेखांचा संग्रह आहे,यातमहात्मा फुले यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे.

नागनाथ कोत्तापल्ले यांनी ‘ज्योतीपर्व’ या आपल्या पुस्तकात महात्मा फुले यांच्या जीवन कार्ये तसेच त्यांच्या वांग्मायीन कार्याचा आढावा घेतला आहे.

हरी नरके यांनी ‘महात्मा फुले शोधाच्या नव्या वाटा’ हा ग्रंथ संपादित केला असून प्रस्तुत ग्रंथात महात्मा फुले यांच्या सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने दुर्लक्षित राहिलेल्या बाजू प्रकाशात आणण्याच्या प्रयत्न केलेला आहे.

श्री. धनंजय कीर, डॉ.मालशे,य.दि. फडके यांनी ‘महात्मा फुले समग्रवांग्मय’ या ग्रंथाचे संपादण केलेले आहे. प्रस्तुत ग्रंथात महात्मा फुले यांच्या सर्व लेखन कालानुक्रमे मांडणी केली आहे.

शिलवंतबापू लिंबा, यांचा 'महात्मा जोतीराव फुले यांचे शूद्रातिशुद्रविषयक विचार एक अभ्यास', हा अप्रकाशित पीएच.डी. शोध प्रबंध, स्वा.रा.ति.म.विद्यापीठ नांदेड. येथे असून प्रस्तुत शोध प्रबंधात महात्मा फुले यांच्या शुद्र व शुद्रातीशुद्र या बाबतीचा विचार आणि त्यांच्या उथाना संबंधीचे कार्ये अधिरेखीत केले आहे.

नरवाडे बालाजी मारोतराव, 'यांनी महत्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे तत्त्वज्ञान – एक चिकित्सक अभ्यास', हापी एच. डी. शोध प्रबंध, ऑक्टोबर २०१७, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड, येथे सादर केला. प्रस्तुत शोधप्रबंधात महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या सत्यशोधक समाजाचे आणि त्यानंतर निर्माण झालेल्या सत्यशोधक चळवळीचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

गंधारे दत्तात्रय केशव, यांनी 'महात्मा फुले यांचा शिक्षणविचार', हापीएच.डी. शोधप्रबंध, ई.स.२००२ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे सादर केला आहे. या शोधप्रबंधात महात्मा फुले यांच्याशिक्षण विषयक विचार आणि कार्याचा अभ्यास पूर्वक आढावा घेतलेला आहे.

गायकवाड द.स यांनी 'महात्मा फुले आणि त्यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक अभ्यास', हा पीएच.डी. शोधप्रबंध, सन १९९८ मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे सादर केला आहे. प्रस्तुत शोधप्रबंधात महात्मा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा चिकित्सक आणि अभ्यासपूर्वक आढावा घेऊन त्या संबंधी सविस्तर मांडणी केलेई आहे.

कांबळे रा. स. यांनी 'महात्मा जोतीराव फुले यांच्या विचाराचा आधुनिक महाराष्ट्रातील प्रभाव' हा पीएच.डी. शोधप्रबंध मे २००३ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे सादर केला असून प्रस्तुत शोधप्रबंधात महात्मा फुले यांच्या विचार व कार्याचा महाराष्ट्रा वरील पडलेल्या प्रभावाचा सविस्तर आढावा घेतलेला आहे.

**प्रस्तावित प्रकरण रचना :-**

**"एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले यांचे समताधिष्ठित कार्य : एक ऐतिहासिक अवलोकन"** या प्रस्तावित विषयाचे संशोधन करताना खालील प्रमाणे एकूण पाच प्रकरणात संशोधन विषयाची मांडणी करण्यात येणार आहे.

**प्रकरण पहिले :एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि महात्मा फुले**

प्रस्तुत प्रकरणा मध्ये एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजजीवन, वर्ण संकल्पना, समाजाची विभागणी, जातीव्यवस्था, स्त्रियांचे प्रश्न, अस्पृश्यता, शुद्र व शूद्रातिशूद्र यांची परिस्थिती, प्रचलित

अनिष्ट प्रथा व परंपरा आणि तसेच एकोणिसाव्या शतकातील आर्थिक आणि धार्मिक परिस्थितीची देखील मांडणी करण्यात येईल. या बरोबरच महात्मा फुले यांच्या प्रारंभिक जीवनाचा आढावा घेण्यात येणार आहे.

**प्रकरण दुसरे : महात्मा फुले यांची समता संकल्पना**

प्रस्तुत प्रकरणा मध्येसमता म्हणजे काय? समतेची संकल्पना व तिचे स्वरूप, समतेचे प्रकार, उगम आणि वैशिष्ट्ये तसेच महात्मा फुले यांची समतेची संकल्पना व तसेच न्याय म्हणजे काय? न्यायसंकल्पनेचे स्वरूप, न्याय संकल्पनेचा उगम, न्यायसंकल्पनेची पार्श्वभूमी, न्यायाचे प्रकार आणि महात्मा फुले यांचा न्याया याबाबतचा दृष्टिकोन यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण तिसरे : महात्मा फुले यांचे समताधिष्ठित धार्मिक व आर्थिक विचार आणि कार्य**

प्रस्तुत प्रकरणात महात्मा फुले यांचे धार्मिक विचार, एकेश्वरवाद, निर्मिकसंकल्पना, सार्वजनिकसत्यधर्म तसेच महात्मा फुले यांचे आर्थिक विचार व कार्य, महात्मा फुले शेती व शेती विषयक सुधारणा कार्य, महात्मा फुले यांचे उद्योगधंदेविषयक कार्य व विचार इत्यादीचा आढावा घेण्यात येणार आहे.

**प्रकरण चौथे : महात्मा फुले यांचे समताधिष्ठित सामाजिक व शैक्षणिक विचार आणि कार्य**

प्रस्तुत प्रकरणात महात्मा फुले यांचे समताधिष्ठित सामाजिक विचार व कार्य, यात अनिष्ट प्रथा व परंपरेला विरोध, स्त्री विषयककार्य, अस्पृश्यता निवारण विषयककार्य, शूद्र व शुद्धी विषयककार्य व तसेच शिक्षण विषयक विचार आणि कार्य, व्यावसायिक व तांत्रिक शिक्षण इत्यादीच्या सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे.

**प्रकरण पाचवे : निष्कर्ष**
प्रस्तुत प्रकरणामध्ये उपरोक्त प्रकणाच्या अभ्यासातून निष्कर्ष काढले जाणार आहेत.

## संदर्भग्रंथ सूची


१) जोतीराव फुले, शेतकऱ्याचा आसूड, चक्रधर प्रिंटींग प्रेस, नागपूर (प्रथमावर्ती - १९९४) वर्तमान आवृत्ती – २०२०

२) जोतीराव फुले, तृतीय रत्न, समता प्रकाशन, नागपूर (प्रथमावर्ती - १९९४) वर्तमान आवृत्ती – २०१७

३) महात्मा जोतीराव फुले, सार्वजनिक सत्य धर्मपुस्तक, समता प्रकाशन, नागपूर , पंधरावी आवृत्ती – २०१८

४) चव्हाण रा.ना. महात्मा फुले यांचा शोध व बोध, रा.ना. चव्हाण प्रतिष्ठान, पुणे, २०१३

५) चव्हाण रा.ना. महात्मा फुले सत्यशोधक समाज व सामाजिक प्रबोधन, चव्हाण रा.ना. प्रतिष्ठान, २००९

६) चव्हाण रा.ना.महात्मा फुले यांचे नवदर्शन एक तौलनिक अभ्यास, रा.ना.चव्हाण प्रतीष्ठान, पुणे २००८

७) तर्कतीर्थ जोशी लक्ष्मण शास्त्री, जोतीचारित्र, नॅशनल बुक ट्रस्, नवी दिल्ली , २०१८

८) यशवंत मनोहर, संग्रामनायक जोतीराव फुले, सनय प्रकाशन, पुणे, ३ जानेवारी २०२०

९) डॉ.साळुंखे आ.ह., महात्मा फुले आणि शिक्षण, प्रकाशक राकेश अण्णासाहेब साळुंखे, पुणे २०१९

१०) शिंदे डॉ.रमेश महात्मा जोतीराव फुले यांचे राजकीय विचार, सायन पब्लिकेशन्स, पुणे २०१५

११) जोगदंड डॉ.बबन, कृषी संवादक महात्मा फुले, स्वयंदीप प्रकाशन, पुणे, २०१९

१२) नरके हरी, महात्मा फुले गौरव ग्रंथ, महात्मा जोतीराव फुले चरित्र प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई, पाचवी आवृत्ती – २०१८

१३) नाईकवाडे डॉ.अशोक, युगप्रवर्तक महात्मा फुले, विद्याभारती प्रकाशन, लातूर, २०१२

१४) कठारे डॉ.अनिल, फुले – शाहू – आंबेडकर, पूनम प्रकाशन, कंधार , २०११

१५) थोरमोटे विपुल, महाराष्ट्रातील समाजसुधारक, ज्ञानदीप अकॅडमी, पुणे, तृतीय आवृत्ती – २०१७

१६) पिंगळे विठ्ठल, आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, वेदिका पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २०१७

१७) राजा दीक्षित डॉ. एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र आणि मध्यम वर्गाचा उदय, पब्लिकेशन्स, पुणे, २००९

१८) सदानंद मोरे डॉ. महात्मा फुले यांचे वैचारिक चरित्र, सकाळ मिडिया प्रा. लि. पुणे, द्वितीय आवृत्ती – २०२१

१९) कल्याणकर बा. ह. महात्मा फुले विचार आणि संदर्भ, प्रकाशक सुनिता व्ही. शिंदे, औरंगाबाद, १९९५

२०) सरदार गं.बा. महात्मा फुले व्यक्ती आणि विचार, ग्रंथाली प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९८१

२१) पाटील पंढरीनाथ, महात्मा जोतीराव फुले, मनोविकास प्रकाशन, पुणे, सुधारित आवृत्ती २००५

टिपा : संशोधनाला जोशी जशी गती येईल तसे तसे संशोधन आराखडयामध्ये थोडा बहूत बदल संभवतो.

संशोधक
**हानमंत नामदेवराव कुरे**
एम.ए.(इतिहास), बी.एड.,सेट,नेट
यशवंत महाविद्यालय, नांदेड

मार्गदर्शक
**डॉ.शिवराज चंद्रकांत बोकडे**
प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक,
पदवी व पद्व्युत्तर इतिहास विभाग
व संशोधन केंद्र, यशवंत महाविद्यालय, नांदेड